स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव विद्याशाखे अंतर्गत
अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी पदवीसाठी संशोधनाचा अराखडा

‘‘मराठवाडयातील दिव्यांगांच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाचे योगदान : एक अभ्यास’’
(२०११ते २०२०)

संशोधक विद्यार्थी
सुर्यवंशी भंडाजी रंगराव
एम.ए., नेट. (अर्थशास्त्र)

संशोधन मार्गदर्शक
प्रा. डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कर्मयोगी तुळशीराम पवार
महाविद्यायल, हाडोळती

संशोधन केंद्र
अर्थशास्त्र विभाग
(सामाजिक शास्त्रे संकुल)
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जून २०१९

अर्ज

प्रति, दि :

मा. उपकुलसचिव,
पी.जी.विभाग,
स्वा.रा.ती.म.विद्यपीठ,
नांदेड.

विषय :— पीएच.डी पदवीचा नियोजित शोधप्रबंध आराखडा स्विकारण्याबाबत

महोदय,

वरील विषयाला अनुसरुन विनंती करण्यात येते की, पदवी करीता संशोधन निर्धारण समितीने माझ्याकडे पीएच. डी. पदवी करीता संशोधन विद्यार्थी म्हणून दिलेल्या सुर्यवंशी भंडाजी रंगराव यांनी ‘‘मराठवाडयातील दिव्यांगांच्या आर्थिक विकासात महाराष्ट्रराज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाचे योगदान : एक अभ्यास’’ २०११ ते २०२० या विषयावर संशोधन शोध प्रबंध आराखडा तयार केला आहे, तरी त्यांच्या पीएच.डी पदवीचा शोधप्रबंध आराखडा स्वीकारुन उपकृत करावे हि विनंती.

सोबत : पाच प्रति जोडण्यात येत आहे.

आपला विश्वासु

प्रा. डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे
एम.ए.(अर्थशास्त्र), पीएच. डी.
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कर्मयोगी तुळशाीराम पवार
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
हाडोळती.

संषोधनाची रुपरेषा

०१ प्रस्तावना
०२ समस्या सुत्रण
०३ संशोधन विषयाची निवड
०४ संशोधन विषयाची उद्दिष्टे
०५ संशोधनाची गृहिते
०६ समस्या सुत्रण
०७ संशोधन पध्दती
०८ संशोधनाचा कालखंड
०९ संशोधन व्याप्ती
१० संशोधनाचे महत्व
११ संशोधनावरील मर्यादा
१२ संशोधनाची प्रकरणे
१३ संकल्पना

“मराठवाडयातील दिव्यांगांच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडाळाचे योगदानः एक अभ्यास”

(२०११ ते २०२०)

प्रस्तावना :.

मनुष्यप्राणी हा इतर सर्व प्राण्यांच्या तुलनेत सर्वश्रेष्ठ प्राणी आहे मनुष्यप्राण्यास निसर्गाने अनेक बाबी वरदान दिलेल्या आहेत, त्यानुसार मानवाने आपले श्रेष्ठत्व सिध्द केले आहे. असे असले तरी निसर्गाने मानवी प्राण्यास दिलेला शाप म्हणजे ‘दिव्यांगत्व’ होय. याला अपंगत्व (disabled) असेही म्हणतात.

सन १९४७ मध्ये संयुक्तराष्ट्र संघातंर्गत बँकॉक येथे आशिया व पॅसिफिक प्रदेशासाठी Economics Social Commision for Asia & Pacific (ESCAP) हा आयोग स्थापण करण्यात आला. या आयोगाने सन १९९२ मध्ये बीजिंग येथे परिषद आयोजित करुन “Proclamation on the full participation & Equality of people with disabilities in the Asian & Pacific Region” अशी घोषणा केली. त्यामुळे दिव्यांग समावेशन विकासाला गती मिळाली.

सन २००६ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर ‘‘दिव्यांग व्यक्तीच्या हक्काचा आंतरराष्ट्रीय करार समंत केला. यात मानवी हक्कात दिव्यांग व्यक्तीच्या हक्कांना विशेष स्थान दिले.

Un-Enable संस्थेच्या मते ‘‘दिव्यांगता म्हणजे कार्यात्मक आरोग्याचा अभाव यात मुख्यता हालचाल, बोधज्ञान, श्रवण व दृष्टीचा अभाव समाविष्ट होतो. भारतात दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळात एका राष्ट्रीय परिषदेची स्थापना करुन दिव्यांगाना शिक्षण-प्रशिक्षण रोजगार यांच्या समावेशनासाठी प्रयत्न केला.

भारतात दिव्यांग अधिकार गट सन १९९३ मध्ये स्थापन झाला अपंगत्व हक्क गटाच्या मोहिमेमुळे सन १९९५ मध्ये अपंगत्व कायदा अस्तित्वात आला. ‘युनिसेफच्या पाहणीनुसार भारतात दिव्यांगतेच प्रमाण सर्वात जास्त आहे. सन २००१ मध्ये देशात २.२१टक्के लोक दिव्यांग होते. महाराष्ट्र जनगणना २००९ नुसार एकूण लोकसंख्येच्या १.०६ टक्के लोकसंख्या दिव्यांग होती.

सन २०११ च्या महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण कृती आराखडयानुसार दिव्यांगाची संख्या १५६९५८२ इतकी असून, अंधव्यक्ती ३७टक्के अस्थिव्यंग दिव्यांग ३६टक्के दिव्यांग कर्णबधिर व्यक्तीचे प्रमाण ६टक्के आहे.

महाराष्ट्र राज्यात दिव्यांग व्यक्तीचे पुनर्वसन सक्षमीकरण व आर्थिक स्वावलंबन करण्यासाठी अधिनियम १९९५, महाराष्ट्र दिव्यांग व्यक्ती **अधि**नियम २००१, राष्ट्रीय न्याय अधिनियम १९९९, २००६ हे कायदे व त्याच्या अंमलबजावणीच्या यंत्रणा कार्यान्वित आहेत.

२. समस्या सूत्रण

दिव्यांगांच्या आर्थिक विकासासाठी महाराष्ट्र सरकार कडुन अनेक योजना राबवल्या जातात. महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामडंळ दिव्यांगाच्या आर्थिक विकासासाठी वित्त पुरवठा करते. दिव्यांगाच्या वाढत्या संख्येचा अभ्यास करता महाराष्ट्रराज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाकडुन दिव्यांगाला केलेले वित्तीयसाहाय्य पुरेशे आहे का?, दिव्यांगाला पुरवण्यात आलेले वित्तीयसाहाय्य व त्यामुळे मराठवाडयातील दिव्यांगांचा आर्थिक विकास साध्य झाला का?, दिव्यांगाला वित्तीयसाहाय्य करण्यात येणाऱ्या अडचणी व वित्तीयसाहाय्यातून दिव्यांगांचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी योग्य ती वित्तीयसाहाय्य वास्तवात किती टक्के दिव्यांगाला लाभ झाला आहे. लाभार्थी दिव्यांगाची संख्या वाढत आहे का?, लाभार्थ्याची संख्या वाढण्यासाठी विशेष उपाय योजनांची गरज आहे का?, इ. समस्यांचा अभ्यास करण्यासाठी ''मराठवाडयातील दिव्यांगाच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र राज्य दिव्यांगवित्तीय विकासाचे योगदान: एक अभ्यास'' हा विषय निवडला आहे.

३. **संशोधन विषयाची निवड :**

१५ ऑगस्ट १९४७ पासूनच सरकारण दुर्बल घटकाच्या विकासासाठी प्रयत्न केले, समाजातील महिला, दिव्यांग, अनु, जाती जमाती, यांना समाजाच्या मुख्यप्रवाहात अणन्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

दिव्यांगाला समाजाच्या मुख्यप्रवाहात आणन्यासाठी भारत सरकाने विभिन्न प्रकारे दिव्यांगाला अर्थसाहय केले आहे. दिव्यांगाला अर्थसाहय करताना न्याय तत्वाचा स्विकार करण्यात आला. व वित्तपुरवठयात वाढ घडून यावी यासाठी स्वतंत्ररित्या महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळ,, २००२ मध्ये स्थापन करण्यात आले.या महामंडळाकडून दिव्यांगाला केला जाणारा वित्तपुरवठा व वित्तपुरवठयाचा विकास तसेच वाढत्या आर्थिक गरजांचा विचार केल्यास महामंडाळकडून केला जाणारा वित्तपुरवठा पुरेसा आहे का? हा एक अभ्यासाचा विषय आहे.

दिव्यांगाला स्वावलंबी बणवन्यासाठी व समाजात ताट मानेने जीवन जगण्यासाठी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळ कसे साहयभूत ठरले याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तूत विषय निवडला आहे. तसेच, संशोधक हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील रहिवासी असलयामुळे मराठवाडयाच्या आर्थिक परिस्थितीचा खुप जवळून संबंध आहे

मराठवाडयात येणार दुष्काळ व या स्थितीत मराठवाडयातील दिव्यांगाला महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाणे दिव्यांगाला केलेला वित्तपुरवठा मराठवाडयातील दिव्यांगांच्या विकासासाठी केलेला वित्तपुरवठा मराठवाडयातील दिव्यांगाचा विकासासाठी महामंडळाणे दिलेली वित्तीय साहय, परतफेड कालावधी व्याजदर इत्यादी अभ्यास करण्यासाठी ''मराठवाडयातील दिव्यांगाच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाचे योगदान : एक अभ्यास हा विषय निवडला आहे.

४ संशोधनाची उदिष्टे :.

१ मराठवाडयातील दिव्यांगाचा अभ्यास करणे.
२ मराठवाडयातील दिव्यांगाच्या वित्तीय साहयाचा अभ्यास करणे.
३ मराठवाडयातील दिव्यांगासाठी असलेल्या शासकीय योजनाचा अभ्यास करणे.
४ मराठवाडयातील दिव्यांगांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

५. गृहितके :

१ मराठवाडयातील दिव्यांगांची संख्या वाढत आहे.
२ शासकीय योजनाचा लाभ मराठवाडयातील दिव्यांग घेत आहेत.
३ मराठवाडयातील दिव्यांग वित्तीय साहय घेत आहेत.
४ मराठवाडयातील दिव्यांगांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा होत आहे.

६. संशोधन पध्दती :

या संशोधना करीता प्राथमिक आणि व्दितीय पध्दतीने माहितीचे संकलन केले जाईल.

प्राथमिक स्त्रोत: दिव्यांग व्यक्तीच्या मुलाखती घेउन प्रश्नावली पध्दतीने माहितीचे संकलन केले जाईल. यात लाभार्थि दिव्यांगाच्या दोन टक्के दिव्यांगाची नमुना म्हणून निवड केली जाईल.

दुय्यम स्त्रोत: प्रस्तुत विषयाच्या संदर्भात पुस्तके संदर्भ ग्रंथ नियतकालीके त्रैमासिक, शासकीय अहवाल, आद्यावत माहितीचे संकलन केले जाईल. उपलब्ध माहिती आकडेवारी, याचे विश्लेषण करण्याकरीता (सरासरी, शेकडाबदल, वुध्दीदर,) इत्यादी **सांख्याकिय** माध्यमाचा वापर केला जाईल.

७. संशोधनाचा कालखंड:

मराठवाडयातील दिव्यांगाच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाची भूमिका याचा अभ्यास करण्यासाठी सन २०११ ते २०२० असा कालखंड निवडण्यात आला आहे.

८. संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे मराठवाडयातील जिल्हयापुरते मर्यादित आहे.

९. संशोधनाचे महत्व :

सन १९४७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने प्रथम दिव्यांग समावेशन या संकल्पनेला महत्त्व दिले, सन २००६ मध्ये अंतरराष्ट्रीय स्तरावर दिव्यांग व्यक्तीच्या हक्काचा आंतरराष्ट्रीय करार संमत केला, मानवी हक्कामध्ये दिव्यांग व्यक्तीच्या हक्काला विशेष महत्व दिले यामध्ये मुख्यता हालचाल, बोधज्ञान, श्रवण, दृष्टीचा अभाव. या चार महत्त्वाच्या पैलू होत्या, या अनुशंघाने भारतात दुस-या पंचवार्षिक योजनाकाळात एक **राष्ट्रीय** परिषद स्थापण करुन दिव्यांग व्यक्तीचे शिक्षण प्रशिक्षण व रोजगार या साठी प्रयत्न केले गेले, सन १९९५ मध्ये दिव्यांगत्वाचा कायदा अस्तीत्वात आला महाराष्ट्र राज्यात या अनुशंघाने राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाची स्थापना २००२ मध्ये करण्यात आली.

केंद्र व राज्य शासकीय योजनाचा मराठवाडयातील दिव्यांगांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत झालेला बदल हा संशोधनाचा अभ्यास असल्यामुळे हा महत्त्वाचा विषय आहे. ही संपूर्ण माहिती जिल्हयाप्रशासन महाराष्ट्र शासन आणि देशातील लोक संस्था यांना उपयुक्त ठरेल.

१०. संशोधनावरील मर्यादा :

प्रस्तुत संशोधन कार्य हे प्राथमिक आणि **दुय्यम** स्त्रोतावर अधारलेले आहे प्राथमिक माहिती दिव्यांग व्यक्ती कडून मुलाखती व्दारे मिळवली जाईल दिव्यांग व्यक्ती **निरिक्षण असाहय** श्रवणाचा अभाव दृष्टीचा अभाव असल्यामुळे मिळणारी माहिती ही मर्यादित आहे. **दुय्यम** स्त्रोतातून मिळणारी सांख्यकीय आकडेवारी ही गोपणीय असल्यामुळे सामुग्री संग्रहणावर मर्यादा पडतात.

११ प्रकरणाची रचना :

१ प्रकरण पहिले	:	प्रस्तावना
२ प्रकरण दुसरे	:	मराठवाडयातील भौगोलिक समाज-आर्थिक वैशिष्टय
३ प्रकरण तिसरे	:	संशोधन साहित्याचे पुणरावलोकण
४ प्रकरण चौथे	:	मराठवाडयातील दिव्यांग व्यक्तीचे सामाजिक–आर्थिक विश्लेषण
५ प्रकरण पाचवे	:	महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडहाची मराठवाडयातील दिव्यांगांच्या आर्थिक विकासातील भूमिका
६ प्रकरण सहावे	:	प्रमुख निष्कर्ष आणि शिफारशी

१२. संदर्भ :

१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११, २०१२, २०१७, २०१८
२. 'Disabled persons in India : A Statistical Profile 2016'. Available on Wikipedia.
३. Gokhale SDFD Social Welfare Leganda 1972. Online Book (PDF).
४. Gupta Sumitra, 'Social Welfeare in India'. Allahabad 1989.
५. Sankhadher, M. M. Jain and Sharada, 'Social Security Welfare and Poity' New Delhi-2004.
६. The Person with disability act 1995.
७. World rport on disability 2011.
८. 'Research Methodolgy: Methods and Techniques' a book by C. R. Kothari.
९. 'अनुसंन्धान पध्दतीशास्त्र' लोकेश के प्रसाद.